पुढारी

विद्यापीठात संत सेवालाल महाराज जयंती साजरी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठात संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रतिमा पवार, डॉ. प्रल्हाद माने, कायदे सल्लागार अनुष्का कदम आदी उपस्थित होते.

पुढारी

शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा सुरळीत सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठांतर्गत व महाविद्यालयांत सुरू असलेल्या २२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या. परीक्षेसाठी एकूण १८ हजार ४०१ विद्यार्थी उपस्थित होते. हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सर्व परीक्षांच्या कामकाजावर बहिष्कार असताना अधिविभागातील अधिविभागप्रमुख, शिक्षक, महाविद्यालयातील प्राचार्य, संपात सहभाग नसलेले शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांच्या सहकार्याने परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या.

पुण्यनगरी

नाईट कॉलेजमध्ये मुद्रितशोधन प्रमाणपत्र अभ्यासक्रम

कोल्हापूर : नाईट कॉलेज येथे शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने 'मुद्रितशोधन प्रमाणपत्र कोर्स' आयोजित केला आहे. २० फेब्रुवारीपासून कोर्स सुरू होणार असून तो एक महिन्याचा आहे. सायंकाळी ६ ते रात्री ८ ही कोर्सची वेळ आहे. कोर्समध्ये मुद्रितशोधनाची संकल्पना, स्वरूप, मराठी लेखनविषयक नियम, व्याकरण, विरामचिन्हे, मुद्रितशोधनाची पद्धती, खुणा, प्रात्यक्षिक याबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. कोर्ससाठी शैक्षणिक पात्रता दहावी उत्तीर्ण असणे गरजेचे आहे. अधिक माहिसाठी इच्छुकांनी मराठी विभागप्रमुख डॉ. अरुण शिंदे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रभारी प्राचार्य डॉ. एस. जे. फराकटे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
16 FEB 2023
पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यापीठ बेसबॉल संघ व्यवस्थापकपदी प्रा. काशीनाथ वनमोरे

नवे पारगाव : प्रतिनिधी

तळसंदे, (ता. हातकणंगले) येथील डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पसचे क्रीडा प्रशिक्षक प्रा. काशीनाथ टी. वनमोरे यांची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बेसबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघ व्यवस्थापकपदी निवड झाली आहे. दि. १४ ते १८ फेब्रुवारीपर्यंत गुवाहाटी येथे ही स्पर्धा होणार आहे.

सकाळ

नाइट कॉलेजमध्ये 'मुद्रितशोधन प्रमाणपत्र अभ्यासक्रम' २० पासून

▸ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १५ : नाइट कॉलेज कोल्हापूरच्या मराठी विभागाच्या वतीने २० फेब्रुवारीपासून एक महिन्याचा 'मुद्रितशोधन प्रमाणपत्र कोर्स' आयोजित केला आहे.

आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर मान्यताप्राप्त या कोर्समध्ये मुद्रितशोधनाची संकल्पना, स्वरूप, मराठी लेखनविषयक नियम, व्याकरण, विरामचिन्हे, मुद्रितशोधनाची पद्धती, खुणा, प्रात्यक्षिक कार्य वगैरेंचे प्रशिक्षण तज्ज्ञ मार्गदर्शक देणार आहेत. नाइट कॉलेजमध्ये सायंकाळी ६ ते ८ या वेळेत कोर्स होणार आहे. प्रवेशासाठी इयत्ता १० वी उत्तीर्ण असावे. इच्छुकांनी २० फेब्रुवारीपर्यंत मराठी विभागप्रमुख डॉ. अरुण शिंदे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्र. प्राचार्य डॉ. एस. जे. फराकटे यांनी केले आहे. शैक्षणिक व संशोधन संस्था, शासनव्यवहार, विविध आस्थापना, मुद्रणालये, वृत्तपत्रे, नियतकालिके, जाहिरात, ग्रंथनिर्मिती आदी क्षेत्रांमध्ये निर्दोष लेखन व मुद्रण अत्यंत आवश्यक आहे. प्रशिक्षित, कुशल मुद्रितशोधकांना मागणी आहे. विद्यार्थ्यांमध्ये मुद्रितशोधनाची कौशल्ये विकसित करून त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणारा हा उपयुक्त कोर्स आहे.